कै. पद्मभूषण वसंतदादा पाटील यांचे स्टेशन चौक, जि. सांगली येथे उभारण्यात येणा-या स्मारकाच्या बांधकामास निधी उपलब्ध करुन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्मारक ३११२/प्र.क्र.२३२/२९
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
तारीख : २३ मार्च, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. स्मारक ३१९९/२१०२/प्र.क्र.२५०/९९/२९,दि.२५ सप्टेंबर, २००१
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण१००६/आ-७/प्र.क्र.६३/२९,दि. २२ सप्टेंबर,२००९
३) शासन ज्ञापन सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण१००६/आ-७/प्र.क्र.६३/२९,दि.१५ जुलै,२०११
४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.स्मारक ३११२/प्र.क्र.२३२/२९, दि. १० फेब्रुवारी, २०१४
५) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.स्मारक ३११४/प्र.क्र.५१/२९, दि. २५ मार्च, २०१४
६) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.स्मारक ३११४/प्र.क्र.१३१/२९, दि. २८ मार्च, २०१४
७) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बजेट४२१३/प्र.क्र.३२१/२९, दि. १२ सप्टेंबर, २०१४
८) जिल्हाधिकारी, सांगली यांचे पत्र क्रमांक अंलेपप/उपयोगिता/२.४०/१६/२०१८, दि.१९ मार्च, २०१८

प्रस्तावना :

कै. पद्मभूषण वसंतदादा पाटील यांचे स्टेशन चौक, जि. सांगली येथे उभारण्यात येणा-या स्मारकाच्या कामास अनु.क्र.४ येथील १० फेब्रुवारी,२०१४ च्या शासन निर्णयान्वये रु.८,१७,२५,२७१/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून उपरोक्त संदर्भ क्र. १,२,३,५,६ व ७ अन्वये अनुक्रमे रु. १००.०० लाख, रु. १८२.०० लाख, रु.४०.०० लाख, रु.१५.०० लाख, रु. ६८.०० लाख व रु. २४०.०० असा एकूण रु. ६४५.०० लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. जिल्हाधिकारी, सांगली यांनी संदर्भिय क्र.८ च्या पत्रान्वये रु. २१२.०० लाख निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले असून सदर स्मारकाच्या पुढील कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

कै. पद्मभूषण वसंतदादा पाटील यांचे स्टेशन चौक, जि. सांगली येथील स्मारकाच्या पूढील कामासाठी चालू वित्तीय वर्षात प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत शिल्लक रु. १,७२,२५,२७१/- (अक्षरी रुपये एक कोटी बहात्तर लाख पंचवीस हजार दोनशे एकाहत्तर फक्त) इतकी रक्कम मंजूर करण्यात येत असून सदर निधी जिल्हाधिकारी,सांगली यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

२. सदरचा निधी वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७/ प्र.क्र. ७५/ अर्थसंकल्प-३, दि.१८ एप्रिल,२०१७ मधील परि.१४ नुसार ठेव बांधकामाच्या स्वरुपात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग न करता चालू वर्षी या कामावर खर्ची घालण्याची जिल्हाधिकारी, सांगली यांनी दक्षता घ्यावी.

३. सदरचा खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा व तो खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्रमांक -ए-४,
मुख्य लेखाशीर्ष, २०५९, सार्वजनिक बांधकामे,
(८०) सर्वसाधारण
(८००) इतर खर्च
(००)(०३) राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांची स्मारके व पुतळे यांचे बांधकाम
योजनेतर (२०५९ ३२०१),
२७ - लहान बांधकामे

४. उपरोक्त निधीमधून खर्च करण्यासाठी तहसिलदार सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली (सांकेतांक क्रमांक २४०१०००९४८) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर स्मारकाच्या खर्चाची जबाबदारी जिल्हाधिकारी, सांगली यांची राहील. त्यांनी निधीच्या उपयोगितेसंबंधीची माहिती उपयोगिता प्रमाणपत्रासह वेळोवेळी शासनास सादर करावी व महालेखापालांच्या लेख्याशी खर्चमेळाबाबतची कार्यवाही करावी.

५. हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८,भाग पहिला,उपविभाग पाच मधील अनुक्रमांक-१,महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ अनुसार व वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल,२०१७ मधील परिच्छेद ७ (क) व परिच्छेद ८ अनुसार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत स्मारकासाठीचा एकूण मंजूर निधी पूर्णपणे उपलब्ध करुन देण्यात आला असल्यामुळे यापुढे वाढीव निधीचा/सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत मान्य करता येणार नाही. याद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या निधीचे योग्यरितीने नियोजन करुन स्मारकाचे काम पूर्णत्वास न्यावे व स्मारकाचे काम पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र लवकरात लवकर सादर करावे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२६१५३८५३४४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Mahesh Kisan Wavhal

Digitally signed by Mahesh Kisan Wavhal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400027, st=Maharashtra, 2.5.4.20=20283e5186ccca8f0350182971072649a1b738829e2db98425839104e8e271f1, cn=Mahesh Kisan Wavhal
Date: 2018.03.27 11:36:06 +05'30'

(म.कि. वाव्हळ)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.पालकमंत्री, जिल्हा सांगली,
४. प्रधान सचिव (र.व का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. सचिव, (बांधकामे) सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई,
६. विभागीय आयुक्त, पुणे.

७. जिल्हाधिकारी, सांगली,
८. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
९. महालेखापाल -१ (लेखापरिक्षा), मुंबई.
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली,
११.सहसंचालक, लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
१२.निवासी उपजिल्हाधिकारी,सांगली,
१३.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),सांगली,
१४.कक्ष अधिकारी (कार्यासन व्यय- ४/अर्थसंकल्प-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५.कक्ष अधिकारी (कार्या-२५ /कार्या-२६), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६.कार्यासन अधिकारी (इमा-३),सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई.
१७.निवडनस्ती (कार्यासन २९), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई